ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222**

Centre for Collaborations and Special Initiatives

## Contribution in COVID-19 Period

As a part of the social Responsibility Centre for Collaborations and Special Initiatives of Yashwantrao Chavan Maharashtra Open University had taken great initiatives for helping people as well as in taking care of their all employees in this pandemic situation. We have provided many daily essentials like grocery, fruits etc. to the road side children as well as the pillars of the society our police men who were working hard to control the situations in lockdown period. University has conducted various activities for all the employees from antigen tests to vaccinations. University has also helped COVID active patients with the isolation facility in the campus area with treatment and full health care.





**SOP at University campus**





 

with the support of Nashik Municipal Corporation,Around 600 Staff members of Yastwantrao Chavan Maharashtra Open University were administered rapid antigen test. Around 21 staff members tested coronavirus positive. Mostly belongs to security and Daily Wage staff. We isolated them and provide them rooms in our guest house and further they were administered RT-PCR test for detailed report.

Anti-gen Testing in University campus for all employees

 

 

**Yoga sessions for COVID-19 Patients who are isolated in campus**





Vaccination for employees



प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

नाशिक मंगळवार, ४ मे २०२१ : स्थापना वर्ष ८३ । नाशिक आवृत्ती वर्ष ७ वे

नाशिक : मुक्त विद्यापीठातील कोरोना लसीकरण मोहिमेप्रसंगी उपस्थित अधिकारी-कर्मचारी.

## मुक्त विद्यापीठात ६०० जणांचे लसीकरण

नाशिक : पुढारी वृत्तसेवा









**Donated dry wood for Cemetery**

A appeal came from the commissioner of Nashik and Malagaon Municipal Corporation that their is shortage of dry wood in all municipal maintained cremation grounds for burning the COVID dead bodies. Responding to their appeal Yashwantrao Chavan Maharashtra Open university supplied around 10 tracks of dry wood to Nashik and 2 tracks to Malagoan nearing around 50 tons.

आपलं महानगर

# मुक्त विद्यापीठातर्फे २५ टन लाकडे मोफत

## नाशिक, पंचवटी, सिडको, गंगापूरच्या स्मशानभूमींना पुरवठा; १५ वर्षांपासून पडलेली वनसंपत्ती उपयोगात

**नाशिक** : कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मृत्यूचे आकडे झपाट्याने वाढत असताना अंत्यसंस्कारांसाठी आता स्मशानभूमीतील लाकडेही कमी पडू लागली आहेत. या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने स्वत: पुढाकार घेत गेल्या १५ वर्षांपासून पडून असलेली २५ टन वनसंपत्ती महापालिकेला मोफत दिली आहे.

मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांच्या पुढाकाराने शुक्रवार (दि.२३) रोजी १२ टन लाकडांच्या पाच गाड्या नाशिकमधील स्मशानभूमीत पाठवण्यात आल्या. पंचवटी अमरधाम, नाशिक अमरधाम, सिडको, गंगापूर येथील अमरधाममध्येही ही लाकडे पुरवली जाणार आहेत. मुक्त विद्यापीठाच्या १५० एकरच्या कॅम्पसमध्ये सुबाभूळ, बाभूळ, निलगिरी, पेरु आदी वृक्ष आहेत. या झाडांच्या वेळोवेळी फांद्या छाटल्या जातात. द्राक्ष, आंबा, पेरुची छाटणी केली जाते. त्यांची लाकडेही विद्यापीठाच्या प्रांगणात साठवलेली आहेत. सामाजिक वनिकरण विभागानेही येथे हजारो वृक्षांची लागवड केली आहे. यातून वाळलेल्या वृक्षांची तोडणी होते. त्यामुळे दरवर्षी मुक्त विद्यापीठात शेकडो टन लाकडे साठतात. या लाकडांचा जाहीर लिलाव करुन विक्री होत असते. परंतु, कोरोनाच्या संकट काळात स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी लाकडेही कमी पडत असल्याचे महापालिकेने म्हटले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत मुक्त विद्यापीठाने २५ टन लाकडे मोफत देण्याचा निर्णय घेतला. शुक्रवारी (दि.२३) पहिल्या दिवशी ५ गाड्याही रवाना झाल्या. दुसऱ्या दिवशी अजून ५ गाड्यांचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.





“कोरोना काळात शक्य तेवढी मदत करण्याची तयारी मुक्त विद्यापीठाने ठेवली आहे. महापालिकेने आवाहन केल्यानंतर आम्ही स्मशानभूमीसाठी २५ टन लाकडे दिली. गेल्या १५ वर्षांपासून ही लाकडे विद्यापीठात पडून होती.

– **प्रा.ई.वायुनंदन**, कुलगुरु, मुक्त विद्यापीठ, नाशिक

ग्रामीण भागातूनही मागणी आल्यास त्यांनाही लाकडे देणार असल्याचे मुक्त विद्यापीठाने म्हटले आहे. महापालिकेने पाठवलेल्या गाड्या भरुन शहरातील अमरधाममध्ये पाठवण्यात आल्या. यावेळी कुलगुरु प्रा.ई. वायुनंदन, दिनेश भोंडे, मदन पाटील, राजाराम पाटील, कैलास मोरे आदी कर्मचारी उपस्थित होते.

Nashik Edition
Apr 24, 2021 Page No.
Powered by : eReleGo.com

# अंत्यविधीसाठी दिले दोनशे टन लाकूड

## विद्यापीठाचे दातृत्व; परिसरातील जळाऊ लाकडे मनपास सुपूर्द

» विधायक

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. ९ : कोरोनामुळे मृत्यूसंख्या वाढत असताना स्मशानभूमीत गरजू व निराधारांना अंत्यविधीसाठी लाकडे कमी पडू नये, यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने परिसरातील अनगड व जळाऊ लाकडे जळगाव मनपास सुपूर्द केली आहेत.

कोरोनाच्या या उद्‌भवलेल्या स्थितीत स्मशानभूमीत लाकडे कमी पडू नयेत, यासाठी प्रभारी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांच्या पुढाकाराने विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने विद्यापीठ परिसरातील जळाऊ लाकडे देण्याचा निर्णय घेतला.

> विद्यापीठ परिसरात गेल्या दोन वर्षांपासून वाळलेली व कोसळून पडलेल्या झाडांची लाकडे एकत्र करून ठेवण्यात आली होती. कोरोनाच्या काळात मृतांची संख्या वाढली असून, स्मशानभूमीत लाकडे कमी पडू नयेत, यासाठी विद्यापीठाने मनपास ही सर्व लाकडे देण्याचा निर्णय घेतला. विद्यापीठ संकटाच्या काळात समाजाच्या मदतीला नेहमीच धाऊन जात असते. तोच पायंडा यावेळी देखील कायम ठेवण्यात आला.
> –प्रा. ई. वायुनंदन, प्रभारी कुलगुरू

### दोनशे टन लाकूड

विद्यापीठाच्या ६५० एकरच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यातील कोसळलेली किंवा वाळलेली झाडे एकत्रित करून ठेवली होती. त्यामध्ये निम, गुलमोहर, सुबाभूळ, निलगिरी, तसेच काही काटेरी वृक्षांचा समावेश आहे. मनपाशी विद्यापीठाने पत्रव्यवहार केला व स्मशानभूमीच्या दैनंदिन कामासाठी ही सुमारे दोनशे टन लाकडे मोफत देण्याची तयारी दर्शविली. शनिवारी महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील, महापालिकेचे आयुक्त सतीश कुलकर्णी, माजी महापौर तथा सिनेट सदस्य व नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी विद्यापीठास भेट दिली व विद्यापीठ प्रशासनाला आभाराचे पत्र दिले.



जळगाव : विद्यापीठ परिसरातील जळाऊ लाकडे महापालिकेकडे सुपूर्द करताना कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन. शेजारी महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील, आयुक्त सतीश कुलकर्णी आदी.

